# पोलीस उपायुक्तांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

## पंख, क्विक हिल फाऊंडेशनतर्फे थेट-भेट कार्यक्रमात केले शंकांचे निरसन

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) - समाजातील गुन्हेगारी कमी का होत नाही?... मुलींनी पोलीस क्षेत्रात येण्यासाठी कशी तयारी करावी... इंटरनेट सर्फींग करताना कोणती काळजी घ्यावी... मनात आत्महत्येचा विचार आल्यास आत्महत्या करणे योग्य आहे का.. जसे तुम्ही आमचे आयडॉल आहात, तसे तुमचे आयडॉल कोण? असे एकामागून एक खुद्द पोलीस उपायुक्तांनाही विचारात पाडणारे प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारून सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.

पंख व क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने थेट-भेट कार्यक्रमाअंतर्गत हुतात्मा बालवीर शिरीषकुमार शाळेतील विद्यार्थ्यांशी पोलीस उपायुक्त तुषार दोशी यांनी संवाद साधला. या वेळी बालगुन्हेगारी व पोलीस क्षेत्राशी निगडित विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांनी मनातील शंकांना मोकळी वाट करून दिली. यावेळी क्विक हिल फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास काटकर, दहशतवादविरोधी पथकाचे अधिकारी अरविंद गोकुळे, आदर्श मित्र मंडळाचे उदय जगताप, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद भोई उपस्थित होते.

**■ वाईट गोष्टींना प्रतिसाद देऊ नका, मनाची हाक ऐका**

**■ चांगल्या गोष्टींमध्ये सहभागी होणे आपल्याच हातात**



पुणे : पोलिस उपायुक्त तुषार दोशी यांनी बुधवारी बालवीर शिरीषकुमार शाळेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

माझ्या आयडॉल किरण बेदी असून, पोलिस ऑफीसर होण्यासाठी अभ्यास आणि व्यायाम आवश्यक आहे, अशा सहज व मुलांना समजेल अशा शब्दांत तुषार दोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दोशी म्हणाले की, आपल्या अवतीभवती चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी घडत असतात. आपण कशामध्ये सहभागी व्हायचे, हे आपल्या हातात आहे. ११ ते १८ हे घडण्या-बिघडण्याचे वय असते. बऱ्याचदा या वयात गल्लीतला एखादा भाईगिरी करणारा 'दादा' मुलांना आयडॉल वाटायला लागतो आणि ते त्याच्याप्रमाणे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. नकळत वाईट मार्गाला लागल्यानंतर पश्चात्ताप होतो. सर्वप्रथम आपले मन ही गोष्ट वाईट आहे, याची जाणीव आपल्याला करून देत असते. मनाची ही हाक ऐकूनच वाईट गोष्टींना प्रतिसाद देऊ नका. मोबाईलमधील जी गोष्ट आई-वडिलांना दाखवता येणार नाही, अशा गोष्टी तत्काळ 'डिलिट' करा, असा सल्लाही दोशी यांनी या वेळी दिला. नातेवाईक अथवा ओळखीच्या व्यक्तींकडून अत्याचार होत असतील, तर त्याबाबत सर्वप्रथम काय करावे, कोणाला माहिती द्यावी, याबद्दलचे मार्गदर्शनही त्यांनी यावेळी केले. 'पंख'चे कैलास काटकर म्हणाले की, आयुष्यात खोटं कधी बोलू नका. तुम्ही जेव्हा खोटे वागता, तेव्हा तुम्ही समोरच्याला नाही, तर स्वत:लाच मूर्ख बनवत असता. तसे करणे म्हणजे स्वत:चीच थट्टा करण्यासारखे आहे. इंटरनेटचा वापर जरूर करा; परंतु त्यातून ज्ञानार्जन करा.

**शाळकरी मुलींबाबत छेडछाडीचे प्रकार घडल्यानंतर कोणाला सांगायचे, असा प्रश्न पडतो. सर्वप्रथम याबाबत आई-वडिलांना सांगा. महिला-मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी हेल्पलाईन आहेत. शंभर नंबरला कॉल करा. तक्रार केल्यानंतर तुमचे नाव गोपनीय राहील. कोणतीही भीती बाळगू नका. पोलीस स्टेशनमधील वुमेन युनिट हेदेखील तुम्हाला सहकार्य करेल.**

**- तुषार दोशी, पोलीस उपायुक्त**